
ePaper
मुंबई महापालिकेत महापौर कुणाचा होणार? ठाकरे बंधूंचा की भाजपा-सेना युतीचा?
| वर्ष - 9 | अंक -143 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- मुंबईच्या 'बालेकिल्ल्यात' UPचा डंका!
- एकच नंबर! अमन मोखाडेचा 'धुरळा'
- घटस्फोट घेण्याची हीच ती वेळ
- ७५ देशांना अमेरिकेचा दणका


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 16 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महानगर पालिका एक्झिट पोलः** पुणे–पिंपरीत भाजप आघाडीवर, पण सत्ता अजूनही सुरक्षित नाही

# पुणे–पिंपरीचा नवा कारभारी कोणाचा?

## अजित पवार गट ठरणार 'किंगमेकर'?; स्वबळावर सत्ता कठीण, आघाड्यांचे गणित सुरू

| पुणे–पिंपरी | प्रतिनिधी | महाईन्यूज

**पुणे आणि पिंपरी–चिंचवड या राज्यातील दोन महत्त्वाच्या महापालिकांच्या निवडणुकांनंतर समोर आलेल्या एक्झिट पोलमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. दोन्ही शहरांमध्ये भाजप आघाडीवर असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असला, तरी यंदा सत्ता मिळवण्यासाठी भाजपला आघाड्यांवर अवलंबून राहावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुणे आणि पिंपरी–चिंचवडचा पुढचा 'कारभारी' कोण, याबाबत उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.**



### निकालच ठरवणार अंतिम चित्र पुणे–पिंपरीतील सत्तेचा फैसला

पुणे आणि पिंपरी–चिंचवड महापालिकांच्या निवडणुकांनंतर जाहीर झालेल्या एक्झिट पोलमध्ये भाजप आघाडीवर असल्याचे चित्र दिसत असले, तरी दोन्ही महापालिकांतील सत्ता अजूनही पूर्णपणे सुरक्षित मानता येत नाही. एक्झिट पोल हे केवळ अंदाज असून, खरे राजकीय चित्र मतमोजणीनंतरच स्पष्ट होणार आहे. पुणे–पिंपरीत यंदा बहुपक्षीय लढती झाल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी आघाड्यांचे गणित निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे निकालानंतर लगेचच राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

- **एक्झिट पोलनंतर 'कारभारी' कोण, यावर राजकीय धुसफूस**
- **पुणे महापालिकेत भाजप सर्वात मोठा पक्ष, पिंपरी–चिंचवडमध्येही आघाडी; अजित पवार गटाची दोन्ही महापालिकांत निर्णायक भूमिका**
- **पुणे महापालिकेत भाजप ९३ जागांवर आघाडीवर**

**निवडणुकीची पार्श्वभूमी**

पुणे आणि पिंपरी–चिंचवड महापालिकांच्या निवडणुकांसाठी १५ डिसेंबर २०२५ रोजी अधिसूचना जाहीर झाली होती.
२३ ते ३० डिसेंबर : उमेदवारी अर्ज
१ ते १३ जानेवारी : जोरदार प्रचार
१५ जानेवारी २०२६ : मतदान
या काळात दोन्ही शहरांमध्ये सभा, पदयात्रा, रोड शो आणि कोपरा बैठकींचा अक्षरशः धडाका पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी पुणे–पिंपरीत प्रचारासाठी विशेष लक्ष दिले.

**पुणे महापालिका : भाजप आघाडीवर, पण बहुमत काठावर**

पुणे महानगरपालिकेच्या १६५ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता एक्झिट पोलमधून व्यक्त होत आहे.

**PRAB एक्झिट पोल – पुणे महापालिका**

भाजप – ९३ जागा
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) – ४३ जागा
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) – ८
काँग्रेस – ८
शिवसेना (उद्धव ठाकरे) – ७
शिवसेना (शिंदे गट) – ६
इतर – २ ते ५
बहुमतासाठी ८३ जागांची आवश्यकता आहे. भाजप या आकड्याच्या आसपास पोहोचत असला, तरी काही जागांची कमतरता भासण्याची शक्यता आहे.

**२०१७ ची पुनरावृत्ती होणार का? बदललेल्या समीकरणांत भाजपसमोर आव्हान**

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत भाजप पुन्हा एकदा एकहाती सत्ता मिळवणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. २०१७ मध्ये भाजपने ९८ जागा जिंकून पुण्यात निर्विवाद वर्चस्व निर्माण केले होते. मात्र यंदा परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसत आहे, हे एक्झिट पोलचे आकडे स्पष्ट करतात. यंदाच्या निवडणुकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता असली, तरी २०१७ सारखी ताकद टिकवणे कठीण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट, शिवसेनेचे दोन स्वतंत्र गट आणि त्यामुळे निर्माण झालेले नवे राजकीय समीकरण याचा थेट परिणाम भाजपवर झाला आहे. अनेक प्रभागांमध्ये चौरंगी आणि पंचरंगी लढती झाल्याने भाजपला अपेक्षित मताधिक्य मिळाले नसल्याचे चित्र आहे.

**पिंपरी–चिंचवडमध्ये भाजप आघाडीवर, पण सत्ता अजूनही अनिश्चित**

पिंपरी–चिंचवड महानगरपालिका निवडणुकीनंतर जाहीर झालेल्या PRAB एक्झिट पोलनुसार भाजप सर्वात मोठा पक्ष ठरण्याची शक्यता आहे. या एक्झिट पोलमध्ये भाजपाला ६४ जागा मिळतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मात्र एकूण संख्याबळ पाहता भाजपला स्वबळावर सत्ता स्थापन करण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागणार, असे चित्र स्पष्ट झाले आहे.

एक्झिट पोलनुसार उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर असून त्यांना ५१ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पिंपरी–चिंचवडच्या सत्तास्थापनेत अजित पवार गटाची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) ९ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर राहण्याचा अंदाज आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) २, काँग्रेस १ आणि मनसे १ जागेवर समाधान मानतील, असे एक्झिट पोल सांगतो.

**अजित पवार : पुणे–पिंपरीतील 'किंगमेकर'**

पुणे आणि पिंपरी–चिंचवड या दोन्ही महापालिकांत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. पुण्यात ४३, पिंपरी–चिंचवडमध्ये ५१ इतक्या मोठ्या संख्येमुळे सत्तास्थापनेच्या चर्चेत अजित पवार गट केंद्रस्थानी राहणार, हे स्पष्ट आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, "दोन्ही शहरांतील महापौर कोणाचा असेल, हे अजित पवार ठरवतील," असा अंदाज वर्तवला जात आहे.

**महापौरपदाची चढाओढ**

जर भाजप आणि अजित पवार गटात युती झाली, तर महापौर कोणाचा? स्थायी समितीवर कोणाचा वरचष्मा?सत्तेतील वाटा किती?

या मुद्द्यांवर तीव्र राजकीय चर्चा होणार आहे. दुसरीकडे, शरद पवार गट, काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) एकत्र येण्याची शक्यता असली, तरी सत्तेपर्यंत पोहोचणे सोपे नाही.

मनपाची यंत्रणा फेल

## पुणे महापालिकेची यंत्रणा तोकडी

# मतदान केंद्रांवर सुविधांची वानवा!

## ज्येष्ठ नागरिकांना मनस्ताप

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकांत मतदान करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा पुणे महापालिका कारभाऱ्यांना विसर पडल्याने मतदार विशेषत: ज्येष्ठ नागरिकांना मनस्ताप सोसावा लागला. लोकमत प्रतिनिधीने शिवाजीनगरातील प्रभाग क्रमांक १२ च्या भारत इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि प्रभाग क्रमांक ७ सेंट फ्रान्सिस हायस्कूल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मनपा शाळा, सीओईपी येथील मतदार कक्षांची पाहणी केली असता पुणे महापालिकेची यंत्रणा तोकडी पडल्याचे समोर आले.**



निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे प्रत्येक मतदान केंद्रावर मतदारांना पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, दिव्यांग आणि ज्येष्ठ व अपंग मतदारांना रॅम्प या सुविधा पुरविणे आवश्यक होते. मात्र, लोकमतच्या पाहणीत अशा सुविधा कुठेही बघायला मिळाल्या नाहीत. या सुविधांबाबत जाब विचारणाऱ्या मतदारांसोबत मतदान अधिकारी अरेरावी, उद्धट भाषा वापरताना दिसले. मतदार केंद्र एकीकडे आणि बूथ भलतीकडेच यातील अंतरात मोठी तफावत असल्याने बूथवर जाऊन मतदान चिठ्ठी घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना रस्ते ओलांडताना तारेवरची कसरत करावी लागली. यासाठी कोणतीही यंत्रणा महापालिकेने लावली नसल्याने ज्येष्ठ, आजारी, दिव्यांग व अपघात झालेल्या मतदारांना स्वत:च बूथ शोधत चिठ्ठी मिळवावी लागली. त्यात प्रत्येक मतदान केंद्राच्या यादीत एकाच कुटुंबातील काही मतदारांची नावे दुसऱ्या मतदान केंद्रात टाकल्याने ज्येष्ठांसह सर्वच मतदारांची त्रेधातिरपीट उडताना दिसत होती. कुठल्याही मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध होईल अशा पद्धतीने दिशादर्शक फलक न लावल्याने मतदारांना बराच वेळ मतदान केंद्र शोधण्यातच वेळ घालवावा लागला. दरवेळी बीएलओमार्फत घरोघरी मतदार चिठ्ठीचे वाटप केले जात होते. मात्र, यावेळी पुणे महापालिका मतदान जनजागृतीसाठी तोकडी पडल्याची खंत मतदार लोकमत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त करत होते. पाटील वस्ती सीईओपी, पीएमसी कॉलनीकडील मतदान केंद्रांकडे जाताना मतदारांना वाहतूककोंडीचा मोठा सामना करावा लागला. कुठल्याही मतदान केंद्रावर प्रतीक्षा कक्ष, टोकन व्यवस्थेची व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. रांगेमध्ये उभे असलेल्या मतदारांना बसण्यासाठी खुर्ची आणि बाकडे कुठेही ठेवण्यात आले नव्हते. कर्मचाऱ्यांसाठी आणलेल्या चार-दोन खुर्च्याही मोडकळीस आलेल्या होत्या. कुठल्याही मोकळ्या ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रावर मंडपाची उभारणी करताना पुणे महापालिकेने कुचराई केल्याचे दिसले.तसेच केंद्रांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर ठळकपणे मतदार केंद्र क्रमांक, दिशादर्शक फलक न लावल्याने मतदारांना केंद्राच्या इमारती शोधण्यासाठी पायपीट करावी लागली.शिवाजीनगर प्रभाग क्रमांक - ७ सेंट फ्रान्सिस हायस्कूल येथे मतदान करण्यासाठी आलेले पुण्याचे तत्कालीन पोलिस उपायुक्त तथा झोन क्रमांक १ चे प्रमुख विनोद लोखंडे मतदान करायला आले होते. सेंट फ्रान्सिस शाळेचा रॅम्प हा मोठ्या चढउताराचा असल्याने व उखडलेला असल्याने व मतदान केंद्राकडे जाणारी फरशीही तुटलेली असल्याने त्यांच्या वाहनचालकाला लोखंडे यांना व्हीलचेअरवरून मतदार केंद्राकडे घेऊन जाताना मोठा त्रास होत होता.

### पुण्यात कुठे काय घडले?

यावेळी महापालिकेचा कुठलाही स्वयंसेवक हजर नव्हता. दरम्यान, पोलिसांच्या मदतीने त्यांचे मतदान पार पडले. पोलिसांनी त्यांना चांगली मदत केली. याच मतदान केंद्रावर प्रभाग क्रमांक - ७ च्या भाजप उमेदवार तथा माजी नगरसेविका रेश्मा अनिल भोसले या मतदानासाठी आल्या होत्या. मात्र, ओळखपत्र घरी विसरल्याने अधिकाऱ्यांनी त्यांना मतदानापासून रोखले. यावर त्यांनी संयमाने उत्तर देत ओळखपत्र आणले, मगच मतदान केले.

# पुणे निवडणूक अत्यंत चुरशीची

## महापालिकेवर पुन्हा भाजपची सत्ता येण्याचा अंदाज ; राष्ट्रवादीला धक्का

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात आज महानगरपालिकांसाठी मतदान पार पडले आहे. पुणे शहरात जवळपास 36 ते 37 टक्के मतदान झाल्याचे समजते आहे. उद्या 29 महानगरपालिका निवडणुकांचा निकाल जाहीर होणार आहे. दरम्यान पुणे महापालिकेवर कोणाची सत्ता येणार?याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मतदान पार पडल्यावर एक्झिट पोलचे आकडे समोर आले आहेत.**



पुणे महानगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. प्रचार सभेत एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडल्या गेल्या. अजित पवार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रचारात रंगत आणली. नागरिकांना आश्वासने दिली गेली. मात्र आज मतदान झालयावर एक्झिट पोलनुसार पुणे शहरात पुन्हा एकदा भाजपची सत्ता येताना दिसत आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांना मोठा धक्का बसण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.'जनमत'च्या एक्झिट पोलनुसार पुण्यात पुन्हा एकदा भाजपची सत्ता येण्याचा अंदाज आहे. तर अजित पवार आणि शरद पवार यांना मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पुणे शहरात भाजपला 90 ते 93 जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर शिवसेनेला 6 जागा मिळण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला 7 जागा मिळण्याचा अंदाज आहे.

एक्झिट पोलनुसार अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 43 जागा तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 8 जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे अजित पवारांनी दिलेली फ्री मेट्रोची घोषणा फारशी काम करताना दिसून येत नाहीये. मात्र एक्झिट पोलचे हे आकडे केवळ अंदाज आहेत.

### बहुमत कोणाच्या बाजूने येणार?

'जनमत'च्या एक्झिट पोलनुसार मुंबई महानगरपालिकेत भाजप-शिवसेनेची सत्ता येताना दिसून येत आहे. मुंबई महानगरपालिकेत भाजप आणि शिवसनेच्या मिळून 138 जागा निवडणून येण्याचा अंदाज एक्झिट पोलमध्ये वर्तवण्यात आला आहे. तर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे व शरद पवार यांच्या यांच्या आघाडीला 62 जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीला 20 जागा मिळू शकतात. दरम्यान ही आकडेवारी एक्झिट पोलचे आकडे असून खरे आकडेवारी नाही. बहुमत कोणाच्या बाजूने येणार हे उद्याच्या निकालामधूनच स्पष्ट होणार आहे.

## आज १० वाजल्यापासून मतमोजणी ; दोन वाजेपर्यंत निकालाचे चित्र स्पष्ट होणार

# पिंपरी-चिंचवडमध्ये 60 % मतदान!

### रवी लांडगे,सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाल्याने १२६ नगरसेवकांचे भवितव्य मतपेटीत बंद



पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीसाठी शहरात सुमारे 60 टक्के मतदान झाले. शहरातील सांगवी, भोसरी आणि चिखली परिसरातील काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशिन अचानक बंद पडल्याच्या घटना घडल्या. पिंपळे गुरव येथे मतदान केंद्रावरील आधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये हमरी तुमरी झाली. चिंचवडमध्ये माजी महापौरांच्या पतींनी मतदान करतानाची फेसबुक पोस्ट केल्याने त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.**









शहरात ३२ प्रभागांतून १२८ जागांसाठी ६९२ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. भोसरीतील प्रभाग क्रमांक ६ मधून भारतीय जनता पक्षाचे रवी लांडगे, तर प्रभाग १० मधून सुप्रिया चांदगुडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. उर्वरित १२६ जागांसाठी सुमारे १७ लाख 13 हजार मतदारांकरिता २ हजार ०६७ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली होती. सर्व केंद्रांवर सकाळी साडेसात वाजता मतदानाला प्रारंभ झाला. पहिल्या दोन तासांत शहरात सगळीकडे ६.५६ टक्के मतदान झाले होते. सकाळी साडेसात वाजता मतदान प्रक्रिया सुरू झाली. सकाळी साडेसात वाजल्यापासून साडेनऊपर्यंत ६ टक्के मतदान झाले.साडेनऊ ते साडेअकरा या वेळेत १६ टक्के मतदान झाले होते. तसेच दुपारी दीड वाजेपर्यंत २८.७१ टक्के,। आणि साडेतीनपर्यंत ४०.५ टक्के मतदान झाले होते.

मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक फंडे वापरले गेले. काही हॉटेलमध्ये खाद्यपदार्थांवर सवलत होती. काही ठिकाणी रिक्षाचालकांनी प्रवाशांना मोफत सेवा देऊ केली. कॅब सर्व्हिसमध्येही पाच किलोमीटर परिसरात सवलत देऊ करण्यात आली होती. त्याचा लाभ प्रामुख्याने वाकड, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात घेतल्याचे दिसून आले. ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांनीही स्वयंस्फूर्तीने मतदान केले. त्यांच्यासाठी मतदान केंद्रांवर डोली आणि व्हिलचेअर्सची व्यवस्था करण्यात आली होती. या व्यक्तींच्या सोबत ओळखीच्या व्यक्तींना जाण्यासाठी परवानगी देण्यात आली होती.





शहरातील सेलिब्रिटींनीही शूटींगच्या शेड्युल्डमधून वेळ काढला आणि मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, प्रियांका यादव, मृण्मयी गोंधळेकर यांचा समावेश आहे. या सर्वांनी मतदानाचे कर्तव्य बजावल्याचे समाधान व्यक्त केले.सुरक्षा व्यवस्था आणि राजकीय चुरस पिंपरी-चिंचवडमधील चुरस पाहता पोलिसांनी शहरात तगडा बंदोबस्त तैनात केला आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर अतिरिक्त पोलीस कुमक आणि राज्य राखीव दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सत्तासंग्रामासाठी आज सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. मात्र, मतदानाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच शहरातील काही भागांत ईव्हीएम मशिनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने मतदारांना ताटकळत उभे राहावे लागले. त्यातच मतदान केंद्राच्या आत मोबाईल नेण्यास घालण्यात आलेल्या बंदीवरून मतदार आणि निवडणूक अधिकारी यांच्यात अनेक ठिकाणी खटके उडाले, ज्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

#### वादावादी आणि गुन्हे दाखल होण्याचे प्रकार

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशीच प्रभाग क्रमांक १८ मध्ये आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप झाला आहे. भाजपच्या उमेदवार अपर्णा डोके यांचे पती निलेश डोके यांनी मतदान करतानाचा व्हिडिओ आणि फोटो थेट फेसबुकवर अपलोड केल्याचा प्रकार आज सकाळी उघडकीस आला आहे. सर्वसामान्य मतदारांना मतदान केंद्रावर मोबाईल फोन नेण्यास स्पष्ट बंदी घालण्यात आली आहे. असे असतानाही निलेश डोके यांनी मोबाईल मतदान केंद्रात नेला. लोकशाहीचा कणा असलेली मतदान प्रक्रिया ही गुप्त आणि निर्भय असणे अपेक्षित असताना, भाजप उमेदवाराच्या पतीकडूनच नियमांची पायमल्ली होत असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला.

#### मोबाइलवरून यावेळेही गोंधळ

मोबाईल बंदीवरून केंद्रांवर गोंधळ या निवडणुकीत निवडणूक आयोगाने मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात आणि केंद्राच्या आत मोबाईल नेण्यावर कडक निर्बंध लादले आहेत. मात्र, अनेक मतदारांना या नियमाची पूर्वकल्पना नसल्याने किंवा डिजिटल ओळखपत्रासाठी मोबाईल सोबत ठेवल्याने गोंधळ उडाला. “मोबाईल कुठे ठेवायचा?” यावरून केंद्रावरील सुरक्षा रक्षक आणि मतदारांमध्ये शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. अनेक मतदारांनी संताप व्यक्त करत, प्रशासनाने मोबाईल ठेवण्याची पर्यायी व्यवस्था करायला हवी होती, असे मत मांडले.

#### असे होते यंत्रणेचे स्वरूप

मतदान केंद्रे: २०६७
नावीन्यपूर्ण मतदान केंद्र: ०८
महिला कर्मचारी संचलित: ०८
संवेदनशील मतदान केंद्र :४८९
सर्वाधिक केंद्रे(प्रभाग क्र. १६):९७
सर्वांत कमी केंद्रे(प्रभाग क्र. २३:३९

### यंत्रणेच्या बिघाडामुळे मतदारांन मनस्ताप

शहरातील सांगवी, भोसरी आणि चिखली परिसरातील काही मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशिन अचानक बंद पडल्याच्या घटना घडल्या. सकाळी लवकर मतदान करून कामावर जाण्याच्या तयारीत असलेल्या नोकरदार वर्गाला याचा मोठा फटका बसला. काही केंद्रांवर तब्बल पाऊण ते एक तास मतदान प्रक्रिया थांबवावी लागली. निवडणूक प्रशासनाने तातडीने ‘बॅकअप’ मशिन्स तैनात केल्या असल्या, तरी या गोंधळामुळे मतदान केंद्राबाहेर लांबच लांब रांगा लागल्या होत्या. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाबाबत नागरिकांनी यावेळी तीव्र नाराजी व्यक्त केली.



## भूमिका

# शेतकऱ्यांना सोयाबीन रडवणार?

**प्रत्येक वेळी भाषणांचा सूर शेतकरीकेंद्री ठेवायचा आणि हित जोपासण्याची वेळ आली की ग्राहकांचा विचार करायचा ही सगळ्याच सरकारांची नेहमीची सवय. याला केंद्रातले विद्यामान मोदी सरकारही अपवाद नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची सध्याची परवड हेच दाखवून देते. कमी खर्चात होणारे व रोखीने पैसा देणारे पीक म्हणून अलीकडे शेतकरी सोयाबीनकडे वळले.**



गेल्या पाच वर्षांत या पिकाच्या लागवड क्षेत्रात सतत वाढ होताना दिसते. यंदा हे क्षेत्र पाच लाख हेक्टरने वाढले. हे पाहता केंद्र व राज्य सरकारांनी सोयाबीनवरील संशोधन, त्यावर आधारित प्रक्रिया उद्योग यांना चालना देणे गरजेचे होते. तसे काहीच न झाल्याने सध्या हे उत्पादक गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. भाजपला याचा जोरदार फटका अलीकडे झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात बसला. विदर्भ तसेच मराठवाडा या सोयाबीनच्या प्रदेशात ऐन प्रचाराच्या धामधुमीत शेतकऱ्यांचा आक्रोश अनुभवायला मिळाला. त्यापासून बोध घेण्याचे सौजन्य राज्य व केंद्र दाखवत नसल्याचे सध्याचे चित्र आहे. सध्या सोयाबीनचा बाजारभाव केवळ चार हजार रुपये प्रतिक्विंटल, म्हणजे सरकारने जाहीर केलेल्या हमीभावापेक्षा ८९२ रुपयांनी कमी आहे. अशा वेळी बाजारात हस्तक्षेप करण्याची धमक सरकार का दाखवत नाही? केवळ प्रोत्साहनपर मदत वा भरपाई जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा देता येणे शक्य नाही हे सरकारला ठाऊक नाही का? कुण्या एका आवडीच्या उद्योगपतीला या मंदीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त खाद्यातेल आयात करता यावे यासाठी सरकारचे हे दुर्लक्ष सुरू आहे का? जनधन, लखपती व करोडपती दीदी अशा आकर्षक योजनांकडे लक्ष वेधण्याबरोबरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा जास्त दर मिळेल याकडे लक्ष का दिले जात नाही, असे प्रश्न निर्माण होतात.देशात सोयाबीनची ८० टक्के लागवड महाराष्ट्र तसेच मध्य प्रदेशात होते. मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांनी लोकसभेत भाजपला साथ दिली. पण आता तिथेही या उत्पादकांचे आंदोलन जोर धरू लागले आहे. तेही देशाचे कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान ज्या सिहोरमधून निवडून आले तिथेच. मावळा प्रांतात सुरू झालेले हे आंदोलन लवकरच सर्वत्र पसरेल असे चित्र आहे. कारण बाजारात नवीन सोयाबीन यायला वेळ आहे. ते आल्यावर भाव आणखी पडतील. सध्याच्या या पडझडीला आंतरराष्ट्रीय बाजारातील परिस्थिती कारणीभूत आहे. तिथे सध्या फक्त तीन हजार रुपये एवढाच दर आहे हा सरकारचा युक्तिवाद फारच वरवरचा, शेतकऱ्यांची दिशाभूल करणारा आणि तात्कालिक आहे. देशभरातील लाखो शेतकरी सोयाबीनकडे वळत असताना सरकारने या पिकाची उत्पादकता वाढावी यासाठी आजवर काहीही केले नाही. सध्या भारतात ही उत्पादकता हेक्टरी दहा ते १३ क्विंटल आहे तर ब्राझीलमध्ये ३३ क्विंटल. हेक्टरी उत्पादन वाढावे यासाठी बियाण्यांवर संशोधन करणे, प्रक्रिया उद्योगाचे जाळे उभारण्याला प्रोत्साहन देणे हे सरकारचे काम. त्यातील अपयशाकडे होणारे दुर्लक्ष तेल आयात उद्योगात सक्रिय असणाऱ्यांच्या फायद्यासाठी आहे का? प्रक्रिया उद्योगांचे जाळे उभारले तर आयातीच्या क्षेत्रात असलेली काही मोजक्यांची मक्तेदारी मोडीत निघेल अशी भीती कदाचित सरकारला वाटत असावी. महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षांत सोयाबीनवर प्रक्रिया करणारे ६५ उद्योग सुरू झाले. आता त्यातले केवळ ३० कसेबसे सुरू आहेत. त्यांच्या अडचणी सरकारने कधी जाणून घेतल्या का? अशा लहान व मध्यम स्वरूपाच्या उद्योगांचे जाळे देशभर विणले जाणे हे कधीही शेतकऱ्यांच्या हिताचे. मात्र विद्यामान सरकारला अशा विकेंद्रीकरणाऐवजी केंद्रीकरणातच रस दिसतो. कारण तरच बड्या उद्योगसमूहांचे हित जोपासता येते.आजघडीला भारत सोयाबीन उत्पादनात जगात पाचव्या क्रमांकावर आहे. क्षेत्रांत पहिल्या तीनमध्ये येण्याची घाई झालेल्या केंद्र सरकारला या क्षेत्रातही अशी भरारीअसे का वाटत नाही? कृषिक्षेत्राशी संबंधित अडचणी उद्भवतात तेव्हा रोख मदत करून शेतकऱ्यांचा रोष शांत करणे यालाच प्राधान्य देण्याचे काम सरकारे करत आली .

## प्रासंगिक »

### आज रोख

***भल्याभल्यांच्या आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढणाऱ्या सरकारचा आधारस्तंभ असलेल्या 'ईडी'सारख्या यंत्रणेने या निवडणुकीत लक्ष्मीदर्शन घडवणाऱ्यांचाही माग काढावा.***

राज्यातील या निवडणूक हंगामात जवळपास प्रत्येक जण हा प्रकार सुरू असल्याचे छातीठोकपणे सांगतो आणि तरीही त्याविषयी काहीही कोणीही अधिकृतपणे ना बोलते ना त्याची काही दखल घेतली जाते. कोणाच्या मते घरटी दरडोई मतदारानुसार दोन हजार अशी बोली होती तर कोणाच्या मते ती पाच हजारावर गेली. शहराच्या गरीब वस्तीत लाखांचा दौलतजादा झाला. सगळ्याची बेरीज करू गेल्यास ही संख्या काही कोटींच्या घरात जाते. काही भागात अगदी उच्चभ्रू संकुलातील आर्थिकदृष्ट्या श्रीमंत आणि सांस्कृतिकदृष्ट्या दरिद्री रहिवाशांनी आपापल्या अंगणांत संभाव्य नगरसेवकांकडून फरशा घालून घेतल्या, रंगरंगोटी करून घेतली आणि काहींनी पाण्याच्या टाक्या साफ करण्याचे बिल या उमेदवारांवर फाडले. हे सर्व अर्थातच एकतर्फी झाले असे म्हणता येणार नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या आधी ब्रिटिश काळात फेडरल कोर्ट होते. त्याला आधार १९३५ च्या भारत सरकार कायद्याचा होता. नव्याने स्थापन केलेल्या सर्वोच्च न्यायालयाची रचना निर्धारित करणे हे सुरुवातीला संविधानकर्त्यांसमोर आणि नंतर संसदेसमोर आव्हान होते.

# संविधानाच्या तटबंदीचे संरक्षक

संविधानसभेने सुरुवातीला सरन्यायाधीश आणि इतर सात न्यायाधीश अशा आठ जणांचे सर्वोच्च न्यायालय असेल अशी तरतूद केली. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची एकूण संख्या वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार संसदेला असेल, असेही तेव्हाच ठरवण्यात आले. त्यानुसार टप्प्याटप्प्याने न्यायाधीशांची संख्या वाढवण्यात आली. सध्या २०२४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांची संख्या सरन्यायाधीशांसह ३४ इतकी आहे.सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यासाठी पात्रता काय असते? सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होण्यासाठी दोन प्रमुख अटी आहेत: (१) ती व्यक्ती भारताची नागरिक असावी. (२अ) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदाचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा. (२ ब) त्या व्यक्तीला उच्च न्यायालयात किमान १० वर्षे वकिलीचा अनुभव असावा. (क)



राष्ट्रपतींच्या मते सदर व्यक्ती ही विख्यात कायदेतज्ज्ञ असावी. या अटींची पूर्तता होत असेल तर त्या व्यक्तीची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशपदी होऊ शकते.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावर नियुक्त होत असताना राष्ट्रपतींच्या उपस्थितीत संविधानाची शपथ घ्यावी लागते. संविधानाप्रतिच्या निष्ठेबाबत आणि भारताचे सार्वभौमत्व, अखंडत्व टिकेल, अशा वर्तनाबाबत ही शपथ आहे. न्यायाधीशांचे वेतन, भत्ते याबाबत संसद निर्णय घेते. एकत्रित निधीतून या वेतनाचे नियोजन केले जाते. न्यायाधीशांचा कार्यकाळ निश्चित नाही, मात्र वय वर्षे ६५पर्यंत ते कार्यरत राहू शकतात. त्यानंतर ते सेवानिवृत्त होतात. त्याआधी ते राष्ट्रपतींना राजीनामा पत्र लिहून सेवेतून मुक्त होऊ शकतात किंवा राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात. राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना पदावरून दूर करण्यासाठी मुख्यत: दोन कारणे पुरेशी असतात: (१) सिद्ध झालेले गैरवर्तन (२) अकार्यक्षमता. पदावरून काढण्यासाठीची प्रक्रिया १९६८ सालच्या न्यायाधीश चौकशी कायद्यात दिलेली आहे. त्यानुसार लोकसभेच्या १०० किंवा राज्यसभेच्या ५० सदस्यांनी प्रस्ताव सादर करावा लागतो. तो अध्यक्षांनी किंवा सभापतींनी पटलावर ठेवण्यास परवानगी दिली की चौकशी समिती स्थापन केली जाते. या चौकशी समितीनुसार न्यायाधीश दोषी सिद्ध झाल्यानंतर त्यांना पदावरून मुक्त करण्याचा ठराव संसदेसमोर ठेवला जातो. याला महाभियोगाचा ठराव म्हणतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**पैश्यांचा महापूर** राजकीय नेत्यांचे ऐकले , मतदार करणार आज फैसला

# मतांचे 'तिळगुळ' कुणाला ?

## नागपुरात उमेदवारावर हल्ला



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेली दोन आठवडे निवडणूक प्रचाराची राळ उडवून दिल्यावर आज सकाळपासून राज्यातील २९ महापालिका मध्ये मतदानाला सुरुवात झाली असून उद्या होणाऱ्या मत मोजणीत मतदार मतांचे तिळगुळ कुणाच्या हातात देतात यावर राज्याच्या नजर लागल्या आहेत.**

मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांचे गृहजिल्हा नागपुरात आज सकाळी गोरेवाडा भागातील भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला असून कॉंग्रेसने नागपुरात गुंडाना तिकिटे वाटल्याने त्यांची गँउदगिरी वाढल्याचा आरोप आज सकाळी देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आल्यावर मुंबई महापालिकेच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले असून मुंबई नेमकी कुणाच्या ताब्यात जाते यावर मोठे चिंतन होत आहे. राज्यात मुंबई,पुणे,नाशिक नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या प्रमुख आणि आर्थिक सत्ता असणाऱ्या महापालिका ताब्यात घेण्यासाठी महायुती मधील सगळ्याच पक्षात मोठी स्पर्धा लागली होती. पुण्यात पवार तर मुंबईत ठाकरे बंधूंची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. आज दिवसभर सुरु असलेल्या मतदानात मोठ्या शहरात मतदारांचा उत्साह फारसा जाणवला नाही मात्र लहान शहरात जोशाने मतदान झाल्याने मागच्या तुलनेत अनेक महापालिकेत मतदानाची टक्केवारी बरीच वाढली असल्याचे दिसून आले. मुंबईत निवडणूक आयोगाने पाडू हे गॅजेट आणल्याने त्यावर मठी हरकत घेत मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी हा निवडणूक आयोगाच्या मदतीने निवडणूक जिंकण्याचा भाजपचा प्रयत्न असल्याची टीका केली आहे. महापालिकांच्या प्रचार एक दिवस अगोदर बंद झाला असताना सुद्धा भाजपने सोशल मीडियावरील आपला प्रचार थांबला नाही तर अधिक जोरात वाढवला असल्याची तक्रार ठाकरेंच्या सेनेने केली असून कारवाईची मागणी केली आहे. महापालिका निवडणुकीत मतदानाच्या पहिल्या रात्री राज्यभरात सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर पैश्यांचे अवतात करून लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आज ठाकरे गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी केला आहे. अकोला,नागपूर,संभाजीनगर आणि पुण्यात याचे प्रयोग झाल्याची उदाहरणे देत खा. राऊत यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या चुप्पीवर देखील टोला हाणला.

गेली दोन आठवडे निवडणूक प्रचाराची राळ उडवून दिल्यावर आज सकाळपासून राज्यातील २९ महापालिका मध्ये मतदानाला सुरुवात झाली असून उद्या होणाऱ्या मत मोजणीत मतदार मतांचे तिळगुळ कुणाच्या हातात देतात यावर राज्याच्या नजर लागल्या आहेत. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांचे गृहजिल्हा नागपुरात आज सकाळी गोरेवाडा भागातील भाजप उमेदवार भूषण शिंगणे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला असून कॉंग्रेसने नागपुरात गुंडाना तिकिटे वाटल्याने त्यांची गँउदगिरी वाढल्याचा आरोप आज सकाळी देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आल्यावर मुंबई महापालिकेच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष छत्रपती संभाजीनगर या प्रमुख आणि आर्थिक सत्ता असणाऱ्या महापालिका ताब्यात घेण्यासाठी महायुती मधील सगळ्याच पक्षात मोठी स्पर्धा लागली होती.

## आयोगाच्या चुप्पीवर टोला

महापालिका निवडणुकीत मतदानाच्या पहिल्या रात्री राज्यभरात सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांनी मोठ्या प्रमाणावर पैश्यांचे अवतात करून लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आज ठाकरे गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी केला आहे. अकोला,नागपूर,संभाजीनगर आणि पुण्यात याचे प्रयोग झाल्याची उदाहरणे देत खा. राऊत यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या चुप्पीवर देखील टोला हाणला.

# शाई नव्हे लोकशाही पुसली गेली

## निवडणूक आयुक्त कशाचा पगार घेत आहेत: उद्धव ठाकरे




। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महापालिका निवडणुकीत मोठा गोंधळ आणि गैरप्रकार आढळला आहे. सत्ता मिळविण्यासाठी लोकशाहीचा खून करण्यात आला. पालिका निवडणुकीत आता बोटावरची शाई पुसली जात आहे; परंतु ही बोटावरची शाई नव्हे तर लोकशाही पुसली गेल्याची टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.**

निवडणूक आयोगाला दुबार मतदारांची ढिगभर नावे देऊनही त्यात सुधारणा होत नाही. आठ ते नऊ वर्षे निवडणुका झाल्या नसताना आयोगाला एवढ्या वर्षांत साधी तयारी करता येत नाही, निवडणूक आयुक्त कसला पागार घेतात, असा सवालही त्यांनी केला.मतदानाच्या दिवशी झालेल्या गोंधळावरून उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत आयोगाचा समाचार घेतला. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या वेळी बोगस आणि दुबार मतदारांचे गठ्ठे निवडणूक आयोगाला दिले. संबंधित नावे वगळण्याबाबत मोहीम राबवली जाईल, अशी आश्वासन दिले. मुंबई त्यानंतर ११ लाख बोगस आणि दुबार नावे समोर आली. काहींची नावे मतदारसंघातून गायब करण्यात आली तर काहींचे मतदारसंघ बदलण्यात आले. मतदारांना जाणीवपूर्वक त्रास देण्याचा प्रकार झाला. सत्तेसाठी अशाच प्रकारे 'एक देश, एक निवडणूक' धोरण मोदींना अपेक्षित असल्याचा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. पूर्वी राज्यात मत पत्रिकेवर निवडणुका व्हायच्या त्यावेळी मतदान झाल्यानंतर तात्काळ मतमोजणी केली जायची. मध्यरात्री किंवा दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत मतमोजणीचे निकाल जाहीर व्हायचे. जोपर्यंत मतदान होत नाही तोपर्यंत मतपेट्या उघडल्या जात नव्हत्या. . मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाला घरगडी म्हणून नेमले आहे का? की निवडणूक आयुक्तांना काहीच काम नाही.? अशा प्रश्नांची सरबत्ती केली. धाकदपटशाचा प्रकार केल्यानंतर पैसे वाटपाचा प्रकार केला. मात्र, त्याचेही बिंग फुटले. सोशल मीडिया, वृत्तवाहिन्यांतून आयोगाच्या कारभाराच्या बऱ्याच गोष्टी उघड झाल्या आहेत. शिवसेना (ठाकरे) – मनसेच्या उमेदवारांना कोटींची ऑफर देऊन त्यांची उमेदवारी मागे घेण्यासाठी प्रयत्न झाला. साम, दाम, दंड, भेद एवढी खा-खा कशासाठी? असा सवाल त्यांनी केला. महापालिका, नगरपरिषदेच्या निवडणुका जिंकण्यासाठी महायुतीकडे कर्तृत्व नसल्याने निवडणूक आयोगाच्या आडून वाटेल.

## नाईकांचे मतदान केंद्रच फरार

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात मंत्री गणेश नाईक यांचे मतदान केंद्रच फरार झाल्याने त्याचा त्यांनी चार तास शोध घेतला. या सगळ्या गोष्टीवर ईलाज हवा असेल तर सत्ताधाऱ्यांची लाचारी करणाऱ्या निवडणूक आयुक्तांना तात्काळ निलंबित करून कारवाई करायला हवी.

## व्हिसा देण्यावर घातली बंदी
## स्थलांतरित व्हिसा देण्याची प्रक्रिया थांबवली जाणार

# पाकिस्तानसह 75 देशांना अमेरिकेचा दणका

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची दुसऱ्यांदा सूत्रे हाती घेतल्यापासून एकापाठोपाठ एक कठोर निर्णय घेतले. सुरुवातीला त्यांनी अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्या परदेशी नागरिकांची मुस्कटदाबी करून त्यांना देशाबाहेर हाकलून लावले. त्यानंतर अमेरिकेच्या व्यापाराला चालना देण्यासाठी भारतासह अनेक देशांवर अतिरिक्त आयात शुल्काचे हत्यार उगारले.**

इतक्यावरच न थांबता ट्रम्प यांनी दबावतंत्राचा वापर करून विविध देशांबरोबर व्यापार करारही केले. त्यांच्या या निर्णयांमुळे जगभरातील अनेक देश मोठ्या अडचणीत सापडले आहेत. यादरम्यान ट्रम्प प्रशासनाने पाकिस्तान व बांगलादेशसह इतर ७५ देशांतील नागरिकांना स्थलांतरित व्हिसा देण्यावर बंदी घातली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने बुधवारी (१४ जानेवारी) यासंदर्भातील माहिती दिली आहे.

### स्थलांतरित व्हिसा म्हणजे काय?




नेमके काय आहे यामागचे कारण? त्याविषयीचा हा आढावा... अमेरिकेत कायमस्वरूपी स्थायिक होण्यासाठी इच्छुक असलेल्या परदेशी व्यक्तींना स्थलांतरित व्हिसा दिला जातो. त्यासाठी संबंधित व्यक्तीकडे अमेरिकन नागरिक किंवा तेथील इतर रहिवासी असलेल्या निकट नातेवाईकांचे प्रायोजकत्व असणे आवश्यक आहे. या प्रक्रियेसाठी अर्ज करताना संबंधित प्रायोजकाला परदेशी नागरिकाच्या वतीने अमेरिकेच्या नागरिकत्व व स्थलांतर सेवा विभागाकडे अर्ज दाखल करावा लागतो. गेल्या काही वर्षांत या नियमांची पूर्तता करून जगभरातील अनेक देशांमध्ये लोक अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

हीच बाब लक्षात घेता ट्रम्प प्रशासनाने स्थलांतरितांना व्हिसा देण्यास अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे.असोसिएटेड प्रेसने दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेने व्हिसा देण्यास बंदी घातलेल्या यादीत बांगलादेश, अफगाणिस्तान, पाकिस्तान, इराण, इराक, अल्बेनिया, अल्जेरिया, अँटिग्वा आणि बार्बुडा, आर्मेनिया, अझरबैजान, बहामास, बार्बाडोस, बेलारूस, बेलीझ, भूतान, बोस्निया, ब्राझील, म्यानमार, कंबोडिया, कॅमेरून, केप वर्दे, ग्वाटेमाला, गिनी, हैती, जमैका, जॉर्डन, कझाकिस्तान, कोसोवो, कुवेत, किर्गिस्तान, लाओस,, लेबनॉन, लायबेरिया, लिबिया, मॅसेडोनिया, मोल्दोव्हा, मंगोलिया, मॉंटेनेग्रो, मोरोक्को, नेपाळ, निकाराग्वा, नायजेरिया,

### कोणकोणत्या देशांवर बंदी?

नागरिकांचे निकट नातेवाईक किंवा सध्या ग्रीन कार्डधारक असलेल्या व्यक्तींना देण्यात आले होते. ट्रम्प प्रशासनाने नोव्हेंबर २०२५ मध्ये अमेरिकन दूतावासातील अधिकाऱ्यांना व्हिसा अर्जदारांची अधिक काटेकोर व सखोल तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. अर्जदार अमेरिकेत स्थायिक झाल्यानंतर सरकारी कल्याणकारी योजनांवर अवलंबून राहणार नाहीत.

काँगोचे प्रजासत्ताक,रशिया, रवांडा, सेंट किट्स आणि नेव्हिस, सेंट लुसिया, सेंट व्हिन्सेंट आणि ग्रेनेडाइन्स, सेनेगल, सिएरा लिओन, सोमालिया, दक्षिण सुदान, सुदान, सीरिया, टांझानिया, थायलंड, टोगो, ट्युनिशिया, युगांडा, उरुग्वे, उझबेकिस्तान, येमेन, कोलंबिया, कोट दिव्हा,क्युबा, काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक, डोमिनिका, इजिप्त, इरिट्रिया, इथिओपिया, फिजी, गांबिया, जॉर्जिया, घाना आणि ग्रेनेडा यांसारख्या देशांचा समावेश आहे.अमेरिकेच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, स्थलांतरित व्हिसा देण्याची प्रक्रिया थांबवली जाणार असली तरी या काळात विद्यार्थी, पर्यटन आणि अल्पकालीन प्रवासासाठी नॉन-इमिग्रंट (तात्पुरता व्हिसा) व्हिसा देणे सुरूच राहणार आहे. अमेरिकेकडे २०२६ च्या फिफा वर्ल्ड कप आणि २०२८ ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद असल्याने येत्या काळात तेथील तात्पुरत्या व्हिसांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. यादरम्यान २१ जानेवारी २०२६ पासून स्थलांतरितांसाठी देण्यात येणाऱ्या व्हिसांवर बंदी घालण्यात येणार आहे.

गेल्या काही वर्षांत अमेरिकेतील सरकारी कल्याणकारी योजना व आर्थिक मदतीवर अवलंबून राहणाऱ्या परदेशी व्यक्तींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यांना आळा घालणे या बंदीमागचा उद्देश असल्याचे ट्रम्प प्रशासनाने स्पष्ट केले आहे.परराष्ट्र विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये अमेरिकेने ६ लाखांहून अधिक स्थलांतरित व्हिसा जारी केले होते.

# काश्मीरनं घटस्फोट घेण्याची हीच ती वेळ

## लोन यांनी जम्मू काश्मीरचे विभाजन करण्याची मागणी केली

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**काश्मिरी नेता सज्जाद लोन यांनी जम्मूपासून वेगळे झाले पाहिजे, अशी मागणी केली आहे. 'पीपल्स कॉन्फरन्स' या राजकीय पक्षाचे अध्यक्ष लोन म्हणाले की, काश्मीर आणि जम्मू विभागांमधील प्रशासनिक व्यवस्थेचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे.**

जम्मू आणि काश्मीर या दोन वेगळ्या प्रदेशांचे विभाजन करण्याची मागणी करणारे लोन हे काश्मीर खोऱ्यातील पहिले राजकीय नेते आहेत. काही भाजप समर्थकांनी स्वतंत्र जम्मू राज्याच्या मागणीला पुन्हा चालना दिल्यानंतर ही मागणी पुढे आली आहे.कापत्रकार परिषदेत 'पीपल्स कॉन्फरन्स'चे नेते सज्जाद लोन म्हणाले, "जम्मू आणि काश्मीर या विभागांनी सामंजस्याने वेगळे होण्याची वेळ आली आहे. हा फक्त विकासाचा मुद्दा राहिला नाही तर हा जम्मू-काश्मीरमध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर टीका करण्याची ही एक सर्वमान्य पद्धत बनली आहे. मला वाटतं की काश्मिरी लोक अशी वागणूक जास्त दिवस सहन करू शकत नाहीत. मला विश्वास आहे की काश्मीरमध्ये वेगळे होण्याची इच्छा आधीपेक्षा आता जास्त वाढली आहे. आता येथे सत्य उघडपणे स्वीकारणाऱ्या



नेतृत्वाची गरज आहे. नेते सज्जाद यांनी बुधवारी विकास प्रकल्पांवरून मोठे आरोप केले. त्यावेळी ते म्हणाले, काश्मीरमधील विकासकामांना जम्मूमध्ये मोठा विरोध होत आहे. त्यामुळे आता दोन्ही प्रदेशांनी सामंजस्याने वेगळे होण्याची वेळ आली आहे. लोन हे बडगाम जिल्ह्यात नुकतेच घोषित करण्यात आलेले राष्ट्रीय विधी विद्यापीठ जम्मू प्रदेशात स्थलांतरित करण्याच्या आणि जम्मू प्रदेशाला काश्मीरपासून वेगळे करण्याच्या मागण्यांना उत्तर देत होते.गेल्या

### वेगळ्या राज्याची मागणी

भाजपा आमदार शाम लाल शर्मा यांनी जम्मूसाठी स्वतंत्र राज्याची मागणी करून नवा वाद निर्माण केला. भाजपाने शाम लाल यांच्या विधानापासून स्वतःला दूर ठेवले असले तरी, त्यांच्या या मागणीमुळे जम्मूसाठी स्वतंत्र राज्याच्या मागणीला पुन्हा एकदा जोर आला आहे.लोन जम्मूमधील नेतृत्वावर आरोप करत म्हणाले, जेव्हा केंद्राने त्यांच्याकडून सर्व काही हिसकावून घेतले.

आठवड्यात, भाजपा आमदार शाम लाल शर्मा यांनी जम्मूसाठी स्वतंत्र राज्याची मागणी करून नवा वाद निर्माण केला. भाजपाने शाम लाल यांच्या विधानापासून स्वतःला दूर ठेवले असले तरी, त्यांच्या या मागणीमुळे जम्मूसाठी स्वतंत्र राज्याच्या मागणीला पुन्हा एकदा जोर आला आहे.लोन जम्मूमधील नेतृत्वावर आरोप करत म्हणाले, जेव्हा केंद्राने त्यांच्याकडून सर्व काही हिसकावून घेतले, व्यवसाय दुसरीकडे वळवला आणि 'दरबार प्रकल्प' थांबवला, तेव्हा ते शांत राहिले. काश्मीर प्रदेशात ते आपलं शौर्य फक्त आपल्याच लोकांविरुद्ध दाखवतात"इच्छा असल्यामुळेच इथे काश्मीर-केंद्रीत प्रकल्पांविरुद्ध काही भागांमध्ये आंदोलनं होत.

# शाहरुख खानचा अति श्रीमंतांच्या यादीत प्रथमच प्रवेश

बॉलीवूडचा बादशाह किंग खानच्या संपत्तीत मोठी वाढ झाली आहे. भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत त्याच्या नावाचा पहिल्यांदाच समावेश झाला आहे. याचबरोबर तो बॉलीवूडचा सर्वात श्रीमंत अभिनेता झाला आहे. भारतातील सर्वात श्रीमंत लोकांची यादी जाहीर करण्यात आली आहे, ज्यामध्ये किंग खानने हृतिक रोशन आणि अमिताभ बच्चन यांसारख्या अभिनेत्यांना मागे टाकत पहिला क्रमांक पटकावला.ताज्या अहवालानुसार, एका वर्षात शाहरुख खानच्या संपत्तीत तब्बल एक हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे. भारतातील सर्वात श्रीमंतांच्या यादीत गौतम अदानी पहिल्या क्रमांकावर आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी दुसऱ्या क्रमांकावर आहेत.हुरुन इंडिया रिच लिस्ट 2024 प्रसिद्ध करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाहरुख खानने भारतातील सर्वात श्रीमंत अभिनेत्याच्या यादीत पहिला क्रमांक पटकावला आहे. या यादीनुसार, शाहरुखची एकूण संपत्ती ७,३०० कोटी रुपये आहे. तर, फोर्ब्स २०२३ च्या अहवालानुसार, मागच्या वर्षी त्याची एकूण संपत्ती ६,३०० कोटी रुपये होती. एका वर्षात शाहरुख खानच्या संपत्तीत एक हजार कोटी रुपयांची वाढ झाली आहे.शाहरुख खान व्यतिरिक्त अमिताभ बच्चन, जुही चावला, करण जोहर आणि हृतिक रोशन यांचीही नावे या यादीत आहेत. या स्टार्सनीही या यादीत पहिल्यांदाच स्थान मिळवलं आहे. यादीनुसार, अमिताभ बच्चन यांची संपत्ती १६०० कोटी, जुही चावलाची एकूण संपत्ती ४,६०० कोटी, हृतिक रोशनची संपत्ती दोन हजार कोटी आणि करण जोहरची एकूण संपत्ती १४०० कोटी आहे. या यादीत शाहरुख खाननंतर जुही चावलाचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे, त्यानंतर हृतिक रोशन, अमिताभ बच्चन आणि शेवटी करण जोहरचे नाव आहे.शाहरुख खान जाहिराती व चित्रपटांमधून मोठी कमाई करतो. तसेच काही चित्रपटांच्या नफ्यामध्ये स्टार्सचा वाटा असतो. मिळाला असं म्हटलं जातं. त्यानुसार त्याने या चित्रपटातून २०० कोटी रुपये कमावले. तसेच किंग खानचे रेड चिलीज एंटरटेनमेंट हे प्रोडक्शन हाऊस आहे.

# रणवीर-दीपिका होणार शाहरुखचे शेजारी!

बॉलीवूड कलाकारांची लोकप्रियता पाहता, त्यांच्या एखाद्या नव्या चित्रपटाबाबत किंवा त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चाहत्यांना कायमच उत्सुकता असते. बॉलीवूडमधील अशीच लोकप्रिय जोडी म्हणजे दीपिका पादुकोण आणि रणवीर सिंह. 'बाजीराव मस्तानी', 'पद्मावत' व 'रामलीला' यांसारख्या सुपरहिट चित्रपटांतून या जोडीनं प्रेक्षकांची मनं जिंकली. दीपिका आणि रणवीर या दोघांचाही फॅन फॉलोईंग मोठ्या प्रमाणात आहे. अशातच आता दीपिका आणि रणवीर त्यांच्या नव्या घराच्या निमित्तानं पुन्हा चर्चेत आले आहेत.दीपिका आणि रणवीर यांच्या नव्या घराच्या बातमीनं सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. या दोघांनी मुंबईत चार मजल्यांचं घर खरेदी केलं होतं. सध्या त्या घराचं बांधकाम पूर्ण होत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. वांद्रे येथील बॅण्डस्टॅण्ड हा मुंबईतील सर्वांत महागडा परिसर म्हणून ओळखला जातो. याच ठिकाणी सुपरस्टार शाहरुख खानचा 'मन्नत' बंगला आहे. दीपिका आणि रणवीर यांनी खरेदी केलेलं नवं घर शाहरुखच्या बंगल्यापासून काही अंतरावरच आहे. या घराची किंमत १०० कोटी असल्याचं सांगण्यात येत आहे. सध्या हे दोघं ही बाळाच्या स्वागतासाठी सिनेविश्वापासून लांब आहेत. या सप्टेंबर महिन्यात त्यांचं हे नवं घर सज्ज असणार आहे. त्याचबरोबर रायगडमध्येदेखील त्यांनी बंगला खरेदी केल्याचं म्हटलं आहे. दी इंडियन एक्स्प्रेसनं दिलेल्या वृत्तानुसार, अलिबागमध्ये या दोघांनी दोन वर्षांपूर्वीच २२ कोटींचा बंगला खरेदी केला होता.



# अफेअरच्या अफवांवर कुशाची प्रतिक्रिया

अभिनेत्री आणि कंटेंट क्रिएटर कुशा कपिला लवकरच शिल्पा शेट्टी स्टारर 'सुखी' आणि भूमी पेडणेकर स्टारर 'थँक यू फॉर कमिंग'मध्ये दिसणार आहे. घटस्फोटानंतर कुशा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. अलीकडेच कुशाचे नाव अभिनेता अर्जुन कपूरसोबत जोडले गेले. आता कुशाने नुकतेच सांगितले आहे की ती ट्रोलिंगदरम्यान लोकांच्या या विचारसरणीला कशी सामोरे जात आहे. 'जर तुम्हाला असे वाटत असेल की लोकांनी तुमच्याबद्दल नेहमीच चांगले बोलले पाहिजे, तर याचा अर्थ तुम्ही लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवू इच्छित आहात. लोक तुमच्याबद्दल काय बोलतात याची तुम्हाला नेहमी काळजी असते. अभिनेत्री म्हणाली की लोकांच्या विचारांवर नियंत्रण ठेवणे अशक्य आहे. विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती सार्वजनिक व्यक्ती असते. लोक तिच्याबद्दल काय विचार करतात आणि तिच्याकडून काय अपेक्षा करतात याबद्दल कुशा बोलली. ती याचा विचार करत नाही. ती म्हणाली- 'मला ती व्यक्ती व्हायचे नाही, जिला वयाच्या 50 व्या वर्षी असे वाटते की तिने आपले आयुष्य जगले नाही. तिला जे करायचे होते ते केले नाही. सर्वस्व दिले पण स्वतःचा विचार केला नाही. मला असं आयुष्य जगायचं नाही. काही दिवसांपूर्वी कुशाने अर्जुन कपूरसोबतच्या रिलेशनशिपच्या अफवांवर प्रतिक्रिया दिली होती. ती म्हणाली, 'मी दररोज माझ्याबद्दल इतके बाष्कळ वाचते की आता मला माझा औपचारिक परिचय देताना त्याबद्दल बोलायचे आहे. प्रत्येक वेळी जेव्हा मी माझ्याबद्दल काहीतरी वाचते तेव्हा मी आशा करते आणि प्रार्थना करते की माझ्या आईने हे सर्व वाचू नये. तिचे सामाजिक जीवन तसेही बिघडत चालले आहे.



# तैमूरने सामान्य जीवन जगावे : करीना कपूर

करीना कपूर आणि सैफ अली खान यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच पापाराझींचा आवडता राहिला आहे. तो सर्वात जास्त कॅप्चर केला जाणारा स्टार किड देखील ठरला आहे. त्याच्यावर डॉलही बनवण्यात आल्या आहेत. आता एका मुलाखतीत करीना कपूरने बॉलिवूडच्या प्रसिद्ध पापाराझी ट्रेंडबद्दल सांगितले. पालक या नात्याने त्यांनी आपल्या मुलांचे चेहरे फोटोग्राफर्सपासून का लपवले नाहीत हेही त्यांनी सांगितले. एक्सप्रेस अड्डाला दिलेल्या मुलाखतीत करीना म्हणाली, 'ही प्रक्रिया खूपच कठीण होती. आम्ही आमच्या मुलांचे चेहरे छायाचित्रकारांपासून कधीही लपवले नाही कारण त्यामुळे त्यांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. मी सैफशी याबद्दल चर्चा केली होती आणि त्यानेही सुचवले होते की आपण याला एकत्रितपणे सामोरे जावे. करीना म्हणाली, 'आम्हाला नेहमी वाटायचे की, याला असेच सोडणे चांगले. त्यांना लपविल्याने त्यांच्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. असे केल्याने तो लाजाळू झाला असता की त्याच्यावर आणखी काही परिणाम झाला असता कुणास ठाऊक. मी लहान असताना, मला कुठेही बाहेर जायला आवडत नसे कारण माझ्या पालकांनी मला लपवून ठेवले होते. तैमूरने सामान्य जीवन जगावे अशी माझी इच्छा होती. यावेळी करीनाने सांगितले की, तैमूरला वयाच्या 5 व्या वर्षापासून त्याचे फोटो काढले जात असल्याचे लक्षात येऊ लागले होते. अभिनेत्री म्हणाली, 'तो खूप हुशार आहे कारण त्याला माहित आहे की आम्ही कलाकार आहोत. जेव्हा मी त्याला सांगितले की आम्ही चित्रपटांमध्ये दिसतो, तेव्हा तो माझ्याकडे वळला आणि मला विचारले की मी फेमस नाही, मग ते माझे फोटो का काढतात? मात्र, आता तैमूरला याची सवय झाली आहे.

## वॉरियर्सचं खातं उघडलं

## हरलिनच्या अर्धशतकाने MI चा पराभव

# मुंबईच्या ‘बालेकिल्ल्यात’ UPचा डंका!

## यूपीने पहिला विजय मिळवला

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**यूपी वॉरियर्सने विजयाचं खातं उघडलं आहे. महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये यूपी वॉरियर्सला पराभवाचा सामना करावा लागला होता. पण मुंबई इंडियन्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात अखेर यूपी वॉरियर्सने विजय मिळवून गुणतालिकेत खातं उघडलं आहे. १६२ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आलेल्या यूपी वॉरियर्सने दिलेलं आव्हान १८ षटकात पूर्ण करून ७ गडी राखून विजय मिळवला आहे.**



यूपी वॉरियर्सला हा सामना जिंकण्यासाठी १६२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना कर्णधार मेग लॅनिंगने चांगली सुरूवात करून देत २५ धावा जोडल्या. तर किरण नवगिरे अवघ्या १० धावा करत माघारी परतली. त्यानंतर फिबी लिचफिल्ड आणि हरलिन देओलने मिळून वॉरियर्सचा डाव सांभाळला. पण अमेलिया केरने ही जोडी फोडून काढली. फिबी लिचफिल्ड २५ धावांवर झेलबाद होऊन माघारी परतली. तर हरलिन देओलने एक बाजू धरून ठेवली होती. हरलिनने अर्धशतकी खेळी करून विजयात मोलाचे योगदान दिले.या सामन्यात मुंबई इंडियन्सचा संघ नाणेफेक गमावून पहिल्या डावात फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. मुंबईकडून डावाची सुरूवात करण्यासाठी आलेल्या अमनजोत कौरने ३३ चेंडूंचा सामना करत ३८ धावांची चांगली सुरूवात करून दिली. तर जी कमलीनी अवघ्या ५ धावा करत माघारी परतली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या नेट सिव्हर ब्रंटने ४३ चेंडूंचा सामना करत ६५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ९ चौकार आणि १ षटकार मारला. तर हरमनप्रीत कौरने १६ धावा केल्या. मुंबईचा डाव गडबडला होता. पण शेवटी निकोला कॅरीने नाबाद ३२ धावांची खेळी करून मुंबई इंडियन्सची धावसंख्या ५ गडी बाद १६१ धावांवर पोहोचवली.या स्पर्धेत यूपी वॉरियर्सच्या नेतृत्वाची जबाबदारी मेग लॅनिंगकडे सोपवण्यात आली आहे. पण गेल्या तिन्ही सामन्यांमध्ये या संघाला विजयाचा सूर गवसला नव्हता. गुजरात जायंट्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यांमध्ये यूपी वॉरियर्सला पराभवाचा सामना करावा लागला होता. अखेर मुंबई इंडियन्सविरूद्ध खेळताना यूपीने पहिला विजय मिळवला आहे.यूपी वॉरियर्सने विजयाचं खातं उघडलं आहे. महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये यूपी वॉरियर्सला पराभवाचा सामना करावा लागला होता. पण मुंबई इंडियन्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात अखेर यूपी वॉरियर्सने विजय मिळवून गुणतालिकेत खातं उघडलं आहे. १६२ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात आलेल्या यूपी वॉरियर्सने दिलेलं आव्हान १८ षटकात पूर्ण करून ७ गडी राखून विजय मिळवला आहे.

### मुंबईने केल्या १६१ धावा

या स्पर्धेत यूपी वॉरियर्सच्या नेतृत्वाची जबाबदारी मेग लॅनिंगकडे सोपवण्यात आली आहे. पण गेल्या तिन्ही सामन्यांमध्ये या संघाला विजयाचा सूर गवसला नव्हता. गुजरात जायंट्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि दिल्ली कॅपिटल्स संघाविरूद्ध झालेल्या सामन्यांमध्ये यूपी वॉरियर्सला पराभवाचा सामना करावा लागला होता.यूपी वॉरियर्सने विजयाचं खातं उघडलं आहे. महिला प्रीमियर लीग २०२६ स्पर्धेतील सुरूवातीच्या तिन्ही सामन्यांमध्ये यूपी वॉरियर्सला पराभवाचा सामना करावा लागला होता.

या धावांचा पाठलाग करताना कर्णधार मेग लॅनिंगने चांगली सुरूवात करून देत २५ धावा जोडल्या. तर किरण नवगिरे अवघ्या १० धावा करत माघारी परतली. त्यानंतर फिबी लिचफिल्ड आणि हरलिन देओलने मिळून वॉरियर्सचा डाव सांभाळला. पण अमेलिया केरने ही जोडी फोडून काढली. फिबी लिचफिल्ड २५ धावांवर झेलबाद होऊन माघारी परतली. तर हरलिन देओलने एक बाजू धरून ठेवली होती. हरलिनने अर्धशतकी खेळी करून विजयात मोलाचे योगदान दिले.या सामन्यात मुंबई इंडियन्सचा संघ नाणेफेक गमावून पहिल्या डावात फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. मुंबईकडून डावाची सुरुवात करण्यासाठी आलेल्या अमनजोत कौरने ३३ चेंडूंचा सामना करत ३८ धावांची चांगली सुरुवात करून दिली. तर जी कमलीनी अवघ्या ५ धावा करत माघारी परतली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या नेट सिव्हर ब्रंटने ४३ चेंडूंचा सामना करत ६५ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान तिने ९ चौकार आणि १ षटकार मारला. तर हरमनप्रीत कौरने १६ धावा केल्या. मुंबईचा डाव गडबडला होता. पण शेवटी निकोला कॅरीने नाबाद ३२ धावांची खेळी करून मुंबई इंडियन्सची धावसंख्या ५ गडी बाद १६१ धावांवर पोहोचवली.

# एकच नंबर! अमन मोखाडेचा ‘धुरळा’

## कर्नाटकचं स्वप्न धुळीस मिळवत विदर्भ सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या भारतात विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेतील पहिल्या सेमीफायनलचा सामना गतविजेत्या कर्नाटक आणि विदर्भ या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात अमन मोखाडे पुन्हा एकदा विदर्भाच्या विजयाचा हिरो ठरला. निर्णायक सामन्यात विदर्भाचा संघ २८१ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता.**



या धावांचा पाठलाग करताना अमन मोखाडेने १२२ चेंडूंचा सामना करत १३८ धावांची खेळी केली आणि विदर्भाला सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या फायनलमध्ये प्रवेश मिळवून दिला आहे.या सामन्यात विदर्भाला विजयासाठी २८१ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना विदर्भाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. अथर्व तायडे स्वस्तात माघारी परतला. तो १४ चेंडूत ६ धावा करून माघारी परतला. सुरूवातीलाच मोठा धक्का बसल्यानंतर ध्रुव शोरे आणि अमन मोखाडेने मिळून संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळू दुसऱ्या डावासाठी ९८ धावा जोडल्या. त्या नंतर ध्रुव शोरे ६४ चेंडूत ४७ धावा करून माघारी परतला. पण अमनने एक बाजू धरून ठेवली होती.विदर्भाला दुसरा धक्का बसल्यानंतर अमनने रवीकुमार समर्थसोबत मिळून संघाचा डाव सांभाळला. दोघांनी मिळून कर्नाटकच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. दोघांनी मिळून विदर्भाला विजयाच्या जवळ पोहोचवलं. दोघांनी मिळून संघाची धावसंख्या २५० धावांच्या पार पोहोचवली. त्यानंतर विद्याधर पाटीलने अमनला बाद करत माघारी धाडलं. या १४७ धावांच्या भागीदारीच्या बळावर विदर्भाने आपला विजय निश्चित केला.

### अमन मोखाडेची निर्णायक खेळी

रवीकुमारने हर्ष दुबेसोबत मिळून संघाला विजय मिळवून दिला. रवीकुमारने ६९ चेंडूंचा सामना करत ७६ धावांची खेळी केली. यासह विदर्भाने सलग दुसऱ्यांदा फायनलमध्ये प्रवेश केला. अमन मोखाडेने जेव्हा संघाला जास्त गरज होती, तेव्हाच निर्णायक खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने १२२ चेंडूंचा सामना करत १३८ धावांची खेळी केली. हे त्याचे या हंगामातील पाचवे शतक ठरले.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

दि. 16 जानेवारी 2026

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## PCMC निवडणूक : आज सकाळी दहा वाजता

# मतमोजणी सुरु होणार : आयुक्त श्रावण हर्डीकर

### ओळखपत्र दिले आहे, अशा पात्र व्यक्तींनाच मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'पिंपरी-चिंवचड: पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या अनुषंगाने आज मतदान पार पडत आहे. या निवडणुकीची मतमोजणी उद्या, १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता महापालिका हद्दीतील निश्चित केलेल्या ८ ठिकाणी सुरू होणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली.मतमोजणी प्रक्रियेसाठी निवडणूक विभागाने ज्या व्यक्तीला ओळखपत्र दिले आहे, अशा पात्र व्यक्तींनाच मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश देण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.**




मतमोजणी केंद्र परिसरात वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था तसेच प्रसारमाध्यमांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आलेला आहे. निकाल जाहीर करताना अचूकता व पारदर्शकता राखण्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करण्यात येणार आहे. प्रभाग क्रमांक १०, १४, १५ व १९ येथील मतमोजणी स्थानिक संस्था कर कार्यालय, हेडगेवार भवन, प्राधिकरण, से.क्र. २६, निगडी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १० साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक १४ व १९ साठी प्रत्येकी १८ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक १५ साठी मतमोजणीच्या १५ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक १६, १७, १८ व २२ येथील मतमोजणी ऑटो क्लस्टर येथील छोटा हॉल, चिंचवड येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १६ व २२ साठी मतमोजणीच्या प्रत्येकी १४ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक १७ व १८ साठी प्रत्येकी १६ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक ०२, ०६, ०८ व ०९ येथील मतमोजणी संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २ साठी मतमोजणीच्या २१ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ६ साठी मतमोजणीच्या १७, प्रभाग क्रमांक ८ साठी २० फेऱ्या आणि प्रभाग क्रमांक ९ साठी मतमोजणीच्या १८ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक २५, २६, २८ व २९ येथील मतमोजणी ड क्षेत्रीय कार्यालय, औंध-रावेत बीआरटी रोड, रहाटणी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २५ व २९ साठी मतमोजणीच्या प्रत्येकी २० फेऱ्या, प्रभाग क्रमांक २६ व २८ साठी प्रत्येकी २१ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक ०३, ०४, ०५ व ०७ येथील कबड्डी प्रशिक्षण संकुलच्या तळमजल्यावर स्ट्रॉंग रूम व पहिल्या मजल्यावर मतमोजणी, अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरीच्या मागे येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक ०३ साठी मतमोजणीच्या १८ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक ४, ५ व ७ साठी प्रत्येकी १६ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक १, ११, १२ व १३ येथील मतमोजणी सेक्टर १७/१९, स्पाईन रोड शेजारी, सी-१ इमारतीसमोर, घरकुल चिखली टाऊनहॉल, चिखली येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक १ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ११ साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या, प्रभाग क्रमांक १२ साठी मतमोजणीच्या १४ फेऱ्या आणि प्रभाग क्रमांक १३ साठी मतमोजणीच्या १५ फेऱ्या होणार आहेत.

प्रभाग क्रमांक २१, २३, २४ व २७ येथील मतमोजणी स्व. शंकर (अण्णा) गावडे स्मृती कामगार भवन, थेरगाव येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २१ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या, प्रभाग क्रमांक २३ साठी मतमोजणीच्या १० फेऱ्या, प्रभाग क्रमांक २४ साठी १४ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक २७ साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या होणार आहेत. प्रभाग क्रमांक २०, ३०, ३१ व ३२ येथील मतमोजणी मनपाचे कासारवाडी भाजी मंडई (दुमजली हॉल) तळमजल्यावर मतमोजणी व दुसऱ्या मजल्यावर स्ट्रॉंग रूम, कासारवाडी येथे होणार आहे. यामध्ये प्रभाग क्रमांक २० साठी मतमोजणीच्या २० फेऱ्या, प्रभाग क्रमांक ३० साठी मतमोजणीच्या १६ फेऱ्या, प्रभाग क्रमांक ३१ साठी १९ फेऱ्या तर प्रभाग क्रमांक ३२ साठी मतमोजणीच्या १७ फेऱ्या होणार आहेत.

## निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने पाच पोलिसांचे निलंबन

### पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आदेश

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**निवडणूक काळात गैरहजर राहिल्याने पिंपरी-चिंचवड शहर पोलीस दलातील पाच पोलिसांचे निलंबन करण्यात आले. याबाबतचे आदेश पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिले आहेत. पोलीस हवालदार संजय केळकर, सागर बाविस्कर, पोलीस शिपाई जगन्नाथ शिंदे, प्रतिभा गावडे, संतोष जाधव अशी निलंबित केलेल्या पोलिसांची नावे आहेत. हे सर्वजण पोलीस मुख्यालयात नेमणुकीस आहेत.**

पिंपरी-चिंचवड मनपा निवडणुकीसाठी गुरुवारी (१५ जानेवारी) मतदान झाले. त्यापूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील तळेगाव, आळंदी, चाकण नगरपरिषदांची निवडणूक झाली. आता पिंपरी-चिंचवड मनपाची निवडणूक सुरु असून या कालावधीत शहरात अनेक महत्वाचे नेते शहराचा दौरा करत आहेत. अशा कालावधीत मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावला जातो. मनुष्यबळाअभावी आहे त्या मनुष्यबळावर पोलिसांना संपूर्ण कामकाज करावे लागते.

निलंबित केलेले पोलीस अंमलदार मागील काही महिन्यांपासून रजेवर गेले आहेत. त्यांना पोलीस मुख्यालयाकडून अनेक वेळेला पत्र पाठवून कर्तव्यावर हजर होण्यास सांगण्यात आले होते. मात्र त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे कारवाईचा बडगा उगारत




पोलीस आयुक्तांनी पाच जणांचे तडकाफडकी निलंबन केले आहे. कर्तव्यावर हजर न राहण्याबाबत त्यांची विभागीय चौकशी सुरु राहणार असल्याचे आदेशात नमूद आहे.

### GDG ON CAMPUS MIT ACSC तर्फे

# 'AI & ML Simplified' कार्यशाळेचे यशस्वी आयोजन!

## शिक्षण विश्व : विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्याकडे नेणारा ज्ञानप्रवास



। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**GDG ON CAMPUS MIT ACSC यांच्या वतीने "AI & ML SIMPLIFIED: LEARN, BUILD, INNOVATE" या विषयावर शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी CLASSROOM २०२ येथे एकदिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**

या कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (ARTIFICIAL INTELLIGENCE – AI) व मशीन लर्निंग (MACHINE LEARNING – ML) या आधुनिक व उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या मूलभूत संकल्पना सोप्या व समजण्याजोग्या पद्धतीने समजावून देणे हा होता. तसेच या तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष जीवनातील उपयोग, उद्योगक्षेत्रातील करिअर संधी आणि नवोपक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हेही कार्यशाळेचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

कार्यशाळेसाठी विविध विभागांतील एकूण १६० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ८० विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा सहभाग उत्स्फूर्त असून सत्रादरम्यान त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

एड्युनेट फाउंडेशन, पुणे येथील कॉर्पोरेट ट्रेनर श्री. सार्थक नार्नोर यांनी RESOURCE PERSON म्हणून कार्यशाळेला मार्गदर्शन केले. त्यांनी AI व ML मधील क्लिष्ट संकल्पना अत्यंत सोप्या, प्रभावी व उदाहरणांसह स्पष्ट केल्या. उद्योगातील त्यांच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील करिअर संधी, भविष्यातील ट्रेंड्स तसेच या तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व समजण्यास मोलाची मदत झाली.


ही कार्यशाळा डॉ. हर्षा पाटील व प्रा. अश्विनी सातकर यांच्या समन्वयाने यशस्वीरीत्या पार पडली. त्यांना डॉ. सुप्रिया लोंढे, डॉ. माधुरी दरेकर, श्री. सम्मेद बुकशेटे व प्रा. मनीषा पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा उपक्रम माननीय संचालक डॉ. बी. बी. वाफारे तसेच डॉ. सुनील महाजन, अधिष्ठाता (STUDENT AFFAIRS) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. एकूणच, ही कार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व उद्योगाभिमुख ठरली. GDG ON CAMPUS MIT ACSC भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण व तंत्रज्ञानाधारित उपक्रमांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न करणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

> "आजच्या डिजिटल युगात AI आणि MACHINE LEARNING ही केवळ तंत्रज्ञानाची साधने नसून भविष्यातील करिअरची दिशा ठरवणारी शक्ती आहे. विद्यार्थ्यांनी या संकल्पना केवळ शिकून न थांबता त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करून नवोपक्रमाकडे वाटचाल करावी.
> **– सार्थक नार्नोर,**

---

# मतदान करताना ईव्हीएमचा फोटो व्हायरल केल्याप्रकरणी माजी नगरसेवकावर गुन्हा

## मतदान केंद्रावर मोबाईल फोन नेण्यास मनाई असताना मोबाईल फोन स्वतःकडे बाळगला







। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मतदान केंद्रामध्ये ईव्हीएम मशीनवर मतदान करताना फोटो काढून तो सोशल मीडियावर पोस्ट केल्या प्रकरणी भाजप उमेदवार अपर्णा डोके यांचे पती निलेश चंद्रकांत डोके यांच्या विरोधात चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

केंद्र कल्याण प्रमिष्ठा निर्मित सुखी भवन क्रमांक ५५ येथील खोली क्रमांक एक येथे निलेश डोके यांचे मतदान होते. गुरुवारी (१५ जानेवारी) सकाळी साडेसात वाजता ते मतदान करण्यासाठी गेले. मतदान केंद्रावर मोबाईल फोन नेण्यास मनाई असताना देखील त्यांनी मोबाईल फोन स्वतःकडे बाळगला. तसेच ईव्हीएम मशीनचा फोटो काढणे आणि तो प्रसारित करण्यास मनाई आहे. असे असताना देखील निलेश डोके यांनी ते मतदान करतानाचा फोटो काढून सोशल मीडियावर पोस्ट केला. त्यांनी मतदान गोपनीयतेचा भंग केल्या प्रकरणी त्यांच्या विरोधात चिंचवड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २२३, महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत, औद्योगिक नगरी अधिनियम १९६५चे कलम २२/४ व २२/५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलेश डोके हे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड शहराचे पहिले शहराध्यक्ष तसेच पीसीएमटीचे माजी सदस्य आहेत. त्यांच्या पत्नी अपर्णा डोके या माजी महापौर आहेत. त्या यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) सोडून भाजप मध्ये प्रवेश करत प्रभाग क्रमांक १८ मधून मनपाची निवडणूक लढवत आहेत.

## भाजपाचे निवडणूक प्रमुख तथा

# आमदार शंकर जगताप यांनी बजावला मतदानाचा हक्क!

### पिंपळे गुरव येथील मतदान केंद्रावर केले मतदान : लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान करण्याचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात लोकशाहीचा उत्साह शिगेला पोहोचला असून, आज चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. पिंपळे गुरव येथील मतदान केंद्रावर सकाळी त्यांनी मतदान केले. यावेळी नागरिकांमध्ये उत्साही वातावरण दिसून आले.**



मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार जगताप म्हणाले की, "पिंपरी-चिंचवड शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शाश्वत विकासाच्या दिशेने योग्य निर्णय घेण्यासाठी आज मी मतदानाचा पवित्र हक्क बजावला आहे. लोकशाहीने आपल्याला दिलेली ही ताकदच शहराचा चेहरामोहरा बदलू शकते." ते पुढे म्हणाले की, मतदान करणे हे केवळ कायदेशीर कर्तव्य नसून, येणाऱ्या पिढ्यांसाठी सक्षम, सुरक्षित आणि विकासाभिमुख शहर घडवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकावर आहे. महापालिकेच्या माध्यमातून शहराचा पायाभूत विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आणि वाहतूक व्यवस्था यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर निर्णय घेतले जातात. त्यामुळे योग्य प्रतिनिधी निवडण्यासाठी मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार जगताप यांनी सर्व पिंपरी-चिंचवडकरांना आवाहन करताना सांगितले की, "सर्व नागरिकांनी जात-पात, पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन मोठ्या संख्येने मतदान करावे. जास्तीत जास्त मतदान हेच लोकशाहीला बळ देणारे आहे."

दरम्यान, मतदान प्रक्रियेदरम्यान शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांची गर्दी वाढताना दिसून आली. युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक उत्साहाने मतदानासाठी रांगेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले. निवडणूक आयोगाच्या वतीने सुरळीत आणि पारदर्शक मतदानासाठी आवश्यक त्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या असून, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक शहराच्या भविष्यासाठी निर्णायक ठरणार असल्याने, मतदारांचा वाढता सहभाग लोकशाहीच्या बळकटीचे सकारात्मक संकेत देत आहे, अशी भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

---

# "माझं मत स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांना समर्पित" : आमदार महेश लांडगे

### आ. महेश लांडगे यांनी बजावला मतदानाचा हक्क; शहरात चुरशीचे राजकीय वातावरण

। पिंपरी चिंचवड ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आज लोकशाहीचा उत्सव उत्साहात साजरा होत असून, सकाळपासूनच मतदान प्रक्रिया शांततापूर्ण वातावरणात सुरू आहे. शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांची चांगली गर्दी पाहायला मिळत असून, नागरिकांमध्ये मतदानाबाबत उत्सुकता आणि जागरूकता दिसून येत आहे.**




या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी भोसरी येथील मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. सकाळच्या सत्रात त्यांनी मतदान केले असून, यावेळी कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

यंदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्यात थेट राजकीय लढत होत असल्याने, पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या लढतीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले असून, निवडणूक निकाल शहराच्या राजकारणाला नवी दिशा देणारा ठरणार असल्याची चर्चा सुरू आहे.

मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना आमदार महेश लांडगे म्हणाले, "मतदान हा प्रत्येक नागरिकाचा पवित्र अधिकार आणि कर्तव्य आहे. लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी पिंपरी-चिंचवडकरांनी मोठ्या संख्येने मतदान करणे आवश्यक आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम, स्थिर आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे ही काळाची गरज आहे."

ते पुढे म्हणाले, "माझं मत हे स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकरांसाठी समर्पित आहे. लोकशाहीच्या या महोत्सवात प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. मतदानातूनच शहराच्या भविष्यातील दिशा ठरते."

महेश लांडगे यांनी सर्व मतदारांना आवाहन करत सांगितले की, "घरातून बाहेर पडा, मोठ्या संख्येने मतदान करा आणि आपल्या शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावा."

दरम्यान, शहरातील विविध मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची उपस्थिती वाढताना दिसत आहे. युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक उत्साहाने मतदानासाठी रांगेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले. निवडणूक प्रशासनाकडून मतदारांसाठी पिण्याचे पाणी, सावली, मार्गदर्शन यासह आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस बंदोबस्तही कडक ठेवण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील एकूण मतदार संख्या १७ लाख १३ हजार ८९१ इतकी असून, त्यामध्ये ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ महिला आणि १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. मोठ्या मतदारसंख्येमुळे मतदान टक्केवारीकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

दरम्यान, शहरातील काही मतदान केंद्रांवर काही काळासाठी मतदान यंत्रे (ईव्हीएम) बंद पडल्याच्या घटना घडल्या. त्यामुळे काही ठिकाणी मतदारांना प्रतीक्षा करावी लागली. मात्र, निवडणूक प्रशासनाने तात्काळ तांत्रिक अडचणी दूर करत मतदान प्रक्रिया सुरळीत ठेवण्यासाठी वेळीच उपाययोजना केल्या.

एकूणच, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची ही निवडणूक शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार असून, मतदारांचा वाढता सहभाग लोकशाहीच्या बळकटीचे सकारात्मक चित्र दर्शवत आहे.

## युवक, महिला व ज्येष्ठांना मतदानाचे आवाहन

# पिंपरीत आमदार अमित गोरखे यांनी केले सहपरिवार मतदान!

### लोकशाहीचा उत्सव: काळभोरनगर येथील मतदान केंद्रावर बजावला मतदानाचा अधिकार

| पिंरी-चिंचवड ||
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड | राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये मतदान प्रक्रिया शांततेत आणि उत्साहात पार पडत आहे. याच पार्श्वभूमीवर पिंपरी विधानसभेतील स्वामी विवेकानंद काळभोरनगर येथील मतदान केंद्रावर आमदार अमित गोरखे यांनी सहपरिवार आपला मतदानाचा हक्क बजावला.**




यावेळी माध्यमांशी संवाद साधताना आमदार अमित गोरखे यांनी युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्व मतदार बांधवांना लोकशाहीचा उत्सव असलेल्या मतदानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. “लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे. मतदान हा केवळ हक्क नसून एक जबाबदारी आहे,” असे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रभाग क्रमांक १० मधील भाजप उमेदवारांनी देखील आपला मतदानाचा हक्क बजावला असून, सर्व नागरिकांनी आपला लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवक-युवतींमध्ये मोठा उत्साह आणि वेगळाच आनंद दिसून येत असून, लोकशाही सण साजरा करण्याचा हा क्षण असल्याचे माजी नगरसेविका अनुराधाताई गोरखे यांनी सांगितले.

भारतीय जनता पार्टीच्या वतीने पिंपरी विधानसभेत जास्तीत जास्त म्हणजेच १०० टक्के मतदान होण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात येत असून, प्रत्येक मतदाराने निर्भयपणे आणि उत्साहाने मतदान करावे, असे आवाहन आमदार अमित गोरखे यांनी केले आहे. लोकशाही प्रक्रियेत जनतेचा मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढावा, हाच या आवाहनामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---

## राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडणूक प्रमुख नाना काटे यांनी मतदानाचा हक्क बजावला

### लोकशाहीच्या या महत्त्वाच्या प्रक्रियेत मोठ्या संख्येने सहभागी व्हा : नाना काटे

| पिंपरी चिंचवड |
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज शहरात लोकशाहीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून, सकाळपासूनच मतदान प्रक्रिया शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात सुरू आहे. शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांची लक्षणीय उपस्थिती पाहायला मिळत असून, नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.**




या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पिंपरी-चिंचवड निवडणूक प्रमुख विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी आज प्रभाग क्रमांक २८ अंतर्गत पिंपळे सौदागर-रहाटणी येथील मतदान केंद्रावर जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. सकाळच्या सत्रात त्यांनी मतदान केले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना नाना काटे यांनी नागरिकांना आवाहन करत सांगितले की, “लोकशाही ही आपल्या देशाची सर्वात मोठी ताकद आहे. या लोकशाहीच्या महत्त्वाच्या प्रक्रियेत प्रत्येक मतदाराने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. मतदान हा केवळ अधिकार नाही, तर आपल्या शहराच्या भविष्यासाठीची जबाबदारी आहे.” ते पुढे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून शहराच्या विकासाचे अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि नागरी सुविधा यांसारख्या विषयांवर महापालिकेची भूमिका निर्णायक असते. त्यामुळे सक्षम आणि जबाबदार नेतृत्व निवडण्यासाठी मतदारांनी जागरूकपणे मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

नाना काटे यांनी विशेषतः युवक, महिला आणि प्रथमच मतदान करणाऱ्या मतदारांना पुढे येण्याचे आवाहन केले. “आपल्या एका मतामुळे शहराच्या विकासाची दिशा ठरते. त्यामुळे कोणताही दबाव न घेता, निर्भयपणे आणि विचारपूर्वक मतदान करा,” असे ते म्हणाले.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या या निवडणुकीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले असून, ही निवडणूक शहराच्या राजकारणासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. शहरातील विविध मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची गर्दी दिसून येत आहे. निवडणूक प्रशासनाकडून मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, या निवडणुकीत मोठ्या संख्येने मतदारांचा सहभाग झाल्यास, त्याचा स्थानिक प्रशासनाच्या धोरणांवर तसेच शहराच्या दीर्घकालीन विकासावर महत्त्वपूर्ण परिणाम होऊ शकतो. त्यामुळे मतदारांचा वाढता उत्साह हा लोकशाहीच्या बळकटीचे सकारात्मक चित्र दर्शवत आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे.

## युवक, महिला व ज्येष्ठांना मतदानाचे आवाहन

# भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी बजावला मतदानाचा हक्क!

### लोकशाही बळकट करण्याची प्रत्येकाने मतदान करा : शत्रुघ्न काटे

। पिंरी-चिंचवड ।।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आज आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी पिंपळे सौदागर- रहाटणी या आपल्या प्रभागातील मतदान केंद्रावर जाऊन शांततेत आणि उत्साहात मतदान केले.**



या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी आज आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी पिंपळे सौदागर-रहाटणी येथील आपल्या प्रभागातील मतदान केंद्रावर जाऊन शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात मतदान केले. मतदान प्रक्रियेदरम्यान कोणताही गोंधळ न होता सर्व प्रक्रिया सुरळीत पार पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. महानगरपालिका निवडणुकीमुळे शहरातील राजकीय वातावरण तापले असून, विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि उमेदवार सकाळपासूनच मतदान केंद्रांवर दाखल होत आहेत. शत्रुघ्न काटे यांच्या उपस्थितीमुळे भाजप कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह संचारलेला दिसून आला. अनेक कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले तसेच नागरिकांनीही त्यांच्याशी संवाद साधला.

मतदानानंतर माध्यमांशी बोलताना शत्रुघ्न काटे यांनी मतदारांना आवाहन केले. ते म्हणाले, "मतदान करणे हे प्रत्येक नागरिकाचे पवित्र कर्तव्य आहे. लोकशाही अधिक मजबूत आणि सक्षम करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभागी व्हावे. पिंपरी-चिंचवड शहराचा विकास योग्य दिशेने नेण्यासाठी सक्षम, स्थिर आणि विकासाभिमुख नेतृत्व निवडणे अत्यंत गरजेचे आहे."

ते पुढे म्हणाले की, महानगरपालिका ही शहराच्या विकासाची प्रमुख यंत्रणा असून, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण आणि नागरी सुविधा यांसारख्या अनेक मूलभूत विषयांवर महापालिकेचे निर्णय प्रभाव टाकतात. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता विवेकबुद्धीने मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान, शहरातील विविध मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची मोठी गर्दी दिसून येत आहे. युवक, महिला तसेच ज्येष्ठ नागरिकही मतदानासाठी उत्साहाने घराबाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला असून, पोलिस बंदोबस्तासह आवश्यक त्या सर्व सुविधा मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

राजकीय निरीक्षकांच्या मते, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची ही निवडणूक शहराच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. त्यामुळे मतदानाचा वाढता टक्का हा लोकशाहीच्या बळकटीचे सकारात्मक संकेत देत असल्याचे चित्र सध्या शहरात दिसून येत आहे.

---

# माजी आमदार विलास लांडे यांनी सहकुटुंब बजावला मतदानाचा हक्क!

### मतदान करणे हे आपले कर्तव्य असून लोकशाहीने दिलेला हा महत्त्वाचा अधिकार : विलास लांडे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज शहरात लोकशाहीचा उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होत आहे. सकाळपासूनच शहरातील विविध मतदान केंद्रांवर मतदारांची मोठी गर्दी पाहायला मिळत असून, शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने मतदान प्रक्रिया सुरू आहे.**



याच पार्श्वभूमीवर माजी आमदार विलास लांडे यांनी आज सहकुटुंब आपला मतदानाचा हक्क बजावला. त्यांनी भोसरी येथील महात्मा फुले विद्यालयातील मतदान केंद्रावर जाऊन मतदान केले. मतदान केंद्रावर पोहोचताच त्यांनी रांगेत उभे राहून लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभाग नोंदवला. त्यांच्या उपस्थितीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

यंदाच्या महापालिका निवडणुकीत विलास लांडे यांचे पुतणे विराज लांडे हे निवडणुकीच्या रिंगणात असल्याने भोसरी परिसरात निवडणूक अधिकच चर्चेचा विषय ठरली आहे. या कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमीमुळे मतदारांमध्येही निवडणुकीबाबत विशेष कुतूहल आणि उत्साह दिसून येत आहे. सकाळपासूनच भोसरी भागातील मतदान केंद्रांवर मतदारांची सतत ये-जा सुरू असून, युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मतदानानंतर माध्यमांशी संवाद साधताना माजी आमदार विलास लांडे यांनी मतदारांना महत्त्वाचे आवाहन केले. ते म्हणाले, "मतदान करणे हे केवळ आपले कर्तव्य नसून लोकशाहीने दिलेला हा एक अत्यंत महत्त्वाचा अधिकार आहे. पिंपरी-चिंचवड शहराच्या तसेच आपल्या प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक नागरिकाने आवर्जून मतदान केले पाहिजे. लोकांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता योग्य आणि विकासाभिमुख नेतृत्वाची निवड करावी."

ते पुढे म्हणाले की, महापालिकेच्या माध्यमातून शहराचा विकास, पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अनेक महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेतले जातात. त्यामुळे मतदारांनी जागरूक राहून आपला मताधिकार वापरणे अत्यंत आवश्यक आहे.

दरम्यान, शहरातील विविध मतदान केंद्रांवर सकाळपासूनच मतदारांची गर्दी दिसून येत आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी निवडणूक प्रशासनाकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून, मतदारांसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. काही केंद्रांवर स्वयंसेवक मतदारांना मार्गदर्शन करताना दिसत आहेत.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046